वर्ष- ११ | अंक- २५ | मुंबई, मंगळवार, ०६ मे ते १२ मे २०२५ | पृष्ठ-४
मूल्य २/- रुपये
PG|2
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027

# पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

सकाळी अनवाणी चालण्याचे हे मोठे फायदे जाणून घ्या

3 → जातनिहाय जनगणनेचे महिला आरक्षण होऊ नये!
शहापूर तालुक्यात महिलांची पाण्यासाठी वणवण ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

# सिंधू नंतर आता चिनाबचे पाणी थांबवले...

## पाकिस्तानच्या तोंडचे पाणी पळवले

**नवी दिल्ली:** भारताने पाकिस्तानची चारही बाजूने मुस्कटदाबी करण्यास सुरुवात केली आहे, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानविरुद्ध उचललेल्या पाऊलांमध्ये सिंधू पाणी वाटप करार रद्द केल्यानंतर, आता चिनाब नदी चे पाणी देखील बागलीहार धरणा द्वारे रोखण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या तोंडचे आणखीन एक पाणी भारताने पळवले आहे. पाकिस्तान सोबतचा कित्येक वर्ष सुरू असलेला सिंधू पाणी वाटप करार रद्द केल्यानंतर, आता चिनाब नदीचे पाणी देखील अडवण्याचा निर्णय भारताने घेतला आहे, हा पाकिस्तानसाठी भारताकडून आणखी एक जबरदस्त धक्का म्हणता येईल.



**बागलीहार धरणातून पाणी अडवले जाणार**

सिंधू करार रद्द केल्यानंतर वुलर सरोवराचे पाणीही पाकिस्तानसाठी बंद झाले आहे. त्यानंतर आता चिनाब नदीवर असलेल्या बागलीहार प्रकल्पाचे पाणी धरणाद्वारे अडवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जम्मूच्या रामबनमध्ये असलेल्या बागलीहार प्रकल्पातील पाणी नियंत्रित करण्याची क्षमता भारताकडे आहे. तसंच, झेलम नदीवर असलेल्या किशनगंगा प्रकल्पासंदर्भातही भारत लवकरच कडक निर्णय घेण्याच्या तयारीत आहे.

**बागलीहार प्रकल्पावरून दीर्घकालीन वाद**

जम्मू-कश्मीरमधील बागलीहार जलविद्युत प्रकल्प पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तानमधील वादाचा केंद्रबिंदू ठरला आहे. बागलीहार धरण हा भारत आणि पाकिस्तानमधील अनेक वर्षांपासूनचा वादाचा मुद्दा आहे. पाकिस्तानने यापूर्वीही याबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेषतः जागतिक बँकेकडे मध्यस्थतेची मागणी केली होती. त्याचप्रमाणे, किशनगंगा प्रकल्पामुळे झेलमची उपनदी नीलम नदीच्या प्रवाहावर होणाऱ्या परिणामांविषयीही पाकिस्तानने आक्षेप नोंदवले आहेत.

# रशियाकडून भारताला मिळाली इग्ला - एस क्षेपणास्त्र



**नवी दिल्ली :** पहलगाममध्ये झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर भारत - पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय लष्कराला रशियन बनावटीच्या इग्ला-एस या खांद्यावरुन चालवता येर्णाया हवाई संरक्षण क्षेपणास्त्रांचा नवा साठा (कन्साईनमेंट) मिळाला आहे. या क्षेपणास्त्रांमुळे जमिनीवर, जंगलात, बोटीत किंवा डोंगराळ भागात उभे राहून थेट विमानाचा किंवा हेलिकॉप्टरचा वेध घेणे शक्य आहे. केंद्राने सैन्याला दिलेल्या आपत्कालीन खरेदी अधिकारांतर्गत केलेल्या कराराचा भाग म्हणून इग्ला-एस क्षेपणास्त्रांचा नवीन पुरवठा प्राप्त झाला आहे.

भारतीय लष्कराने २६० कोटी रुपयांत नव्या इग्ला-एस क्षेपणास्त्रांचा साठा खरेदी केला आहे. ही क्षेपणास्त्र दिवस असो वा रात्र, उन - पाऊस - वादळ - वारा अशा कोणत्याही वातावरणात आणि कोणत्याही वेळी शत्रुच्या विमानाचा किंवा हेलिकॉप्टरचा वेध घेण्यास सक्षम आहेत. भारतीय हवाई दलानेही आधुनिक इग्ला-एस क्षेपणास्त्रांचा साठा खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. लष्कराने तर नवा साठा खरेदी करतानाच आणखी इग्ला-एस क्षेपणास्त्रांची ऑर्डर दिली आहे. या अंतर्गत ४८ लॉंचर्स आणि ९० क्षेपणास्त्र खरेदी केली जाणार आहेत. सध्याचे इग्ला-एस क्षेपणास्त्र इन्फ्रा रेड सेन्सरच्या मदतीने शत्रूवर हल्ला करण्यास सक्षम आहे. भारतीय सैन्य आता लेझर बीमच्या मदतीने आणखी अचूक आणि वेगवान असा हल्ला करुन शत्रू सैन्याला नामोहरम करण्याची योजना आखत आहे. यासाठी भारत लेझर मार्गदर्शक इग्ला-एस क्षेपणास्त्र खरेदी करण्याचा विचार करत आहे. इग्ला क्षेपणास्त्राची पहिली आवृत्ती १९९० च्या सुमारास रशियाच्या सैन्याने वापरली. यानंतर सातत्याने या क्षेपणास्त्रात सुधारणा केल्या जात आहेत. आता या क्षेपणास्त्राची इग्ला-एस ही अतिशय आधुनिक आवृत्ती तयार करण्यात आली आहे. हे अत्याधुनिक क्षेपणास्त्र भारताने खरेदी केले आहे. भारतातल्याच एका कंपनीने जुन्या आवृत्तीच्या क्षेपणास्त्रांच्या विद्यमान साठ्याचे नूतनीकरण करुन दिले आहे. भारतीय सैन्य मोठ्या संख्येने हवाई संरक्षण यंत्रणा खरेदी करणे आणि सज्ज ठेवणे यावर भर देत आहे. लष्कराने स्वदेशी इंटिग्रेटेड ड्रोन डिटेक्शन अँड इंटरडिक्शन सिस्टीम मार्क १ तैनात केली आहे. ही यंत्रणा आठ किमी अंतरावरील ड्रोन शोधून त्यावर प्रतिहल्ला करू शकते. ड्रोन नष्ट करू शकते. या प्रणालीत लेझरच्या मदतीने ड्रोन जाळण्याचीही यंत्रणा आहे.आर्मी एअर डिफेन्स युनिट्सने अलीकडेच जम्मू प्रदेशातील १६ व्या कॉर्प्सच्या हद्दीत लेझरच्या मदतीने शत्रुचा ड्रोन जाळण्याचा प्रयोग यशस्वी केला आहे.

# मालाडमध्ये थरारक हत्या!

# ‘मचमच’ प्रकरणाने हादरली मुंबई

## अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न करणाऱ्याची थेट हत्या! तिघे अटकेत, मृतदेह अद्याप गायब

**मुंबई :** मालाड मधील मालवणी येथील १७ एप्रिल रोजी बेपत्ता झालेला फहिम नझीर सय्यद उर्फ फहिम ‘मचमच’ (वय ४३) याचा पत्ता काही लागत नव्हता. कुटुंबीय थकले, पोलीस शोधात होते, पण फहिम कुठेच सापडला नाही. आणि मग अचानक एका गोपनीय माहितीने पोलिसांच्या हातात लागली थरारक कहाणीची सुरुवात.

भायखळा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चिमाजी आढाव यांना मिळाली एक गोपनीय माहिती - ‘फहिमचा खून झाला आहे आणि त्याचा मृतदेह बोऱ्यात बांधून नाल्यात फेकण्यात आला आहे!’

मालवणी पोलीस ठाण्यात याआधी ड्युटी बजावलेल्या आढाव यांनी तात्काळ मालवणी पोलिसांना या गंभीर प्रकरणाची वर्दी दिली. ही माहिती मिळताच मालवणी पोलिसांनी तात्काळ सैफ फैज शेख (२८), हाझीम इमरान खान (१९), सूरज अरुण ठाकूर (१९) या तीन संशयितांना ताब्यात घेतले.

**उलगडत गेलं खुनाचं गूढ...**

फहिम आणि त्याचा मित्र फैयाज शेख (५२) यांनी एकत्र अमली पदार्थ घेतले. नंतर ते फैयाजच्या घरी गेले, जिथे त्याची पत्नी आणि १५ वर्षांची मुलगीही होती. रात्री सगळे झोपले, पण... फहिमने त्या



अल्पवयीन मुलीकडे अश्लील इशारे केले, ती मोबाईलवर तिच्या प्रियकराशी बोलत होती. घाबरून, तिने आपल्या प्रियकराला सांगितले आणि मग आले तीन तरुण.

या तरुणांनी मिळून फहिमला जबर मारहाण केली आणि हीच मारहाण फहिमच्या मृत्यूचं कारण ठरली. त्याच रात्री त्याचा मृत्यू झाला. त्या तिघांनी फहिमचा मृतदेह बोऱ्यात भरला आणि मालाड पश्चिमेतील मिठ चौकी मेट्रो स्थानकाजवळील नाल्यात तो फेकून दिला. विशेष म्हणजे, आरोपींनी फहिमला मारहाण करतानाचे व्हिडीओही चित्रीत केले होते. एका आरोपीने नशेत ही गोष्ट आपल्या मित्राला सांगितली, ज्याने ही माहिती पुढे पोलीस खबऱ्याला दिली.

**सीसीटीव्हीत पुरावा:**

पोलीस तपासात असेही उघड झाले की, आरोपींनी ऑटोरिक्षाच्या माध्यमातून मृतदेह नेला, आणि त्याचा सीसीटीव्ही पुरावाही पोलिसांनी हस्तगत केला आहे.

**पण अजूनही ‘मृतदेह’ सापडलेला नाही...!**

गुन्हा कबूल झाला, आरोपी अटकेत आहेत, पुरावेही आहेत... पण मृतदेह अजूनही मिळालेला नाही! कारण, नाला आधीच स्वच्छ करण्यात आला होता. हा कचरा मीरा-भाईंदरजवळील डम्पिंग ग्राउंडला पाठवण्यात आला आहे. शुक्रवारी मालवणी, बांगूरनगर, गोरेगाव व भायखळा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी आणि अग्निशमन दलाने घटनास्थळी शोधमोहीम सुरू केली. मात्र नाला आधीच स्वच्छ झाल्यामुळे मृतदेह डंपिंग ग्राउंडला नेण्यात आल्याची शक्यता आहे. सध्या पोलीस मीराभाईंदरजवळील डंपिंग ग्राउंडवर मृतदेहाचा शोध घेत आहेत.

**पोलिसांचं वक्तव्य**

‘खुनाचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. आतापर्यंत तीन आरोपी अटकेत आहेत. अजून काहींना अटक होण्याची शक्यता आहे,’ अशी माहिती मालवणी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांनी दिली.

दरम्यान, या थरारक घटनेने मालवणी परिसरात खळबळ माजली असून, सोशल मीडियावर याची चर्चा रंगली आहे. मृतदेह सापडतो का, आणखी कोण आरोपी आहेत, हे लवकरच स्पष्ट होईल.

# घाटकोपर दुर्घटना विसरलात का? वर्ष झाले, तरीही जाहिरात धोरण अधांतरीच! बीएमसीच्या आश्वासनाचं काय झालं?


**मुंबई :** घाटकोपरमधील भलीमोठी फलक दुर्घटना होऊन १७ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्याला तब्बल एक वर्ष उलटलं, पण मुंबई महानगरपालिकेचं जाहिरात धोरण अद्याप तयार झालेलं नाही. लोकांचा संयम सुटतोय, मुंबईकरांचा रोष वाढतोय, पण पालिकेच्या हालचाली धीम्याच आहेत. २०२४ साली १३ मे रोजी घाटकोपर येथील पेट्रोल पंपावर कोसळलेल्या बेकायदेशीर फलकामुळे घडलेल्या भीषण दुर्घटनेनंतर बीएमसीने बाह्य जाहिरातींसाठी नवीन धोरण तयार करण्याचं आश्वासन दिलं होतं. पण आज वर्षभरानंतरही त्या धोरणाचं अर्धंच चित्र स्पष्ट आहे. गेल्या ऑगस्टमध्ये मसुदा जाहीर झाला, पण नागरिकांच्या सूचना व हरकती घेतल्यानंतर तब्बल तीन महिने काहीच हालचाल नाही, अशी तक्रार येथील कार्यकर्त्यांनी केली आहे.

बीएमसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं की, माजी मुख्य न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या चौकशी अहवालाची प्रतीक्षा केली जात आहे. हा अहवाल अंतिम धोरणात समाविष्ट करण्याची योजना आहे. मात्र एका अधिकाऱ्याने सांगितलं, ‘आता किती दिवस वाट पाहायची? आम्ही धोरण पुढे नेणारच आहोत.’

मिळालेल्या माहितीनुसार, भोसले समितीला नुकतीच एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली असून अहवाल अंतिम टप्प्यात आहे. मूळतः हा अहवाल ६ महिन्यांत द्यायचा होता, पण संदर्भ निश्चित होण्यात विलंब झाल्याने उशीर झाला.


माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांनी आरटीआयद्वारे या धोरणाच्या स्थितीबाबत माहिती मागवली होती, पण पालिकेने कोणताही प्रतिसाद दिला नाही. ते म्हणाले, ‘नागरिकांनी मनापासून सूचना दिल्या, पण पालिकेने माहिती द्यावीशीही वाटली नाही. फलक माफियांचा दबाव असल्याची शंका आहे. विविध सरकारी संस्था आणि बीएमसी यांच्यात महसुली वाटपावरूनही वाद सुरू आहे. पुन्हा घाटकोपरसारखी दुर्घटना होऊ नये यासाठी तातडीने धोरण आणणं आवश्यक आहे.’

दरम्यान, या सुनावणीत महाराष्ट्र स्टेट रोड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (MSRDC) यांच्यासह काही संस्थांनी, त्यांच्या रस्ते व उड्डाणपूलांवरील जाहिरातींच्या उत्पन्नातून बीएमसीला ५० टक्के महसूल वाटपाच्या अटींना विरोध दर्शवला आहे. पालिकेकडून काही सवलतींचा विचार सुरू असून, बीएमसी शहरातील इतर संस्थांवर ‘मोठा भाऊ’ म्हणून आपली भूमिका घेण्याच्या तयारीत असल्याचे संकेत मिळाले आहेत.



# आरोग्य

## सकाळी अनवाणी चालण्याचे हे मोठे फायदे जाणून घ्या



काळी फिरायला जाणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. तथापि, जर तुम्ही सकाळी लवकर गवतावर अनवाणी चाललात तर ते तुमच्या शरीराला आणि मनाला अनेक फायदे देऊ शकते. हे करणे हृदयाच्या आरोग्यासाठी देखील फायदेशीर मानले जाते. म्हणूनच आपले वडीलधारे आपल्याला नेहमी अनवाणी चालायला सांगतात.

सकाळी अनवाणी चालण्याचे फायदे

तज्ज्ञांच्या मते, आपल्या सर्वांच्या शरीरात विद्युत ऊर्जा असते. जेव्हा तुम्ही जमिनीवर अनवाणी चालता तेव्हा जमिनीची विद्युत ऊर्जा शरीरात पोहोचू लागते. यामुळे हाडे मजबूत होतात आणि अनेक आजार दूर होऊ लागतात. म्हणून, दररोज अनवाणी चालणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे.

### रक्ताभिसरण सुधारते

अनवाणी चालल्याने पायांमध्ये रक्ताभिसरण सुधारते. जेव्हा आपण शूज घालतो तेव्हा रक्ताभिसरणात अडथळा येऊ शकतो, परंतु अनवाणी चालल्याने पायांमध्ये रक्तप्रवाह वाढतो, ज्यामुळे शरीराच्या इतर भागांमध्ये देखील ऑक्सिजन आणि पोषक तत्वे पोहोचण्यास मदत होते.

### मूड आणि उर्जेची पातळी सुधारते

अनवाणी चालल्याने ताजेपणा येतो आणि मनःस्थिती सुधारते. जेव्हा तुम्ही जमिनीच्या संपर्कात असता तेव्हा तुमच्या शरीरावर अँटी-ऑक्सिडंट प्रभाव पडतो, ज्यामुळे तुमची ऊर्जा पातळी वाढते आणि ताण कमी होतो.

### संतुलन आणि समन्वय सुधारते

अनवाणी चालण्याने तुमचे शरीर संतुलन सुधारते. यामुळे तुमच्या स्नायूंना चांगले काम करण्याची संधी मिळते, ज्यामुळे तुमचे समन्वय आणि संतुलन सुधारते. ही एक उत्तम पद्धत आहे, विशेषतः ज्यांना वयानुसार संतुलन राखण्यात अडचण येते त्यांच्यासाठी.हे फायदेशीर आहे.

## उन्हाळ्यात कोल्ड्रिंक्स पिण्यापूर्वी त्याचे तोटे जाणून घ्या

उष्णतेपासून आराम मिळवण्यासाठी लोक भरपूर थंड पेये पितात. त्यांना वाटते की ते थंड होते आणि शरीराला फायदा होतो पण हे अजिबात खरे नाही. जास्त पेये तुमचे शरीर पूर्णपणे पोकळ करू शकतात.

कोल्ड्रिंक्समध्ये भरपूर साखर, आम्ल आणि रसायने असतात जी शरीरासाठी अजिबात चांगली नसतात.चला तर या पासून होणारे तोटे जाणून घेऊ या.

### जास्त कोल्ड्रिंक पिण्याचे तोटे

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, कोल्ड्रिंक्स पिण्यामुळे कॅल्शियम कमी होते. यामुळे हाडे हळूहळू कमकुवत होतात. विशेषतः महिला आणि वृद्ध लोक जर जास्त प्रमाणात कोल्ड्रिंक्सचे सेवन करत असतील तर ते त्यांच्यासाठी आणखी हानिकारक ठरू शकते.

कोल्ड्रिंक्स ताजेपणाची भावना देतात, परंतु त्यांच्यामागे लपलेले नुकसान तुम्हाला दीर्घकाळात खूप महागात पडू शकते. जर ती रोजची सवय झाली असेल तर आजपासूनच त्यावर थोडे नियंत्रण ठेवा. तुमच्या आरोग्याला हानी पोहोचू नये म्हणून नैसर्गिक पेये आणि घरगुती रस वापरा

### पोट बिघडणे आणि आम्लपित्त

जास्त कोल्ड्रिंक्स पिण्यामुळे ॲसिडिटी आणि पोटाशी संबंधित समस्या उद्भवतात. ज्यांना आधीच गॅस, अपचन किंवा छातीत जळजळ यासारख्या समस्या आहेत त्यांच्यासाठी हे आणखी धोकादायक ठरू शकते. बऱ्याच वेळा अन्न नीट पचत नाही आणि पोट फुगलेले राहते. लिंबूपाणी, नारळपाणी किंवा ताक यांसारखे नैसर्गिक पेये तहान भागवण्यासाठी चांगले पर्याय आहेत.

### मधुमेह होण्याचा धोका

जास्त कोल्ड्रिंक्स पिण्यामुळे लोकांच्या रक्तातील साखरेची पातळी आधीच थोडी जास्त असते, त्यांच्यासाठी कोल्ड्रिंक्स धोक्याची घंटा आहे. जास्त साखरेचे सेवन केल्याने शरीराची इन्सुलिन संवेदनशीलता कमी होते, ज्यामुळे मधुमेहाचा धोका वाढतो.

### दात किडणे आणि पोकळी

जास्त कोल्ड्रिंक्स पिण्यामुळे दात किडणे आणि पोकळी निर्माण होणे यासारख्या समस्या उद्भवतात. कोल्ड्रिंक्समध्ये साखरेचे प्रमाण खूप जास्त असते. जेव्हा ते दातांना चिकटते तेव्हा बॅक्टेरिया त्याचे आम्लात रूपांतर करतात. ज्यामुळे दातांचा वरचा थर कमकुवत होतो. यामुळे पोकळी आणि क्षय यासारख्या समस्या लवकर उद्भवू शकतात. जर तुम्ही अधूनमधून कोल्ड्रिंक्स पीत असाल तर नंतर तोंड स्वच्छ धुवा.

### वजन वाढणे

जास्त कोल्ड्रिंक्स पिण्यामुळेही वजन वाढते. कोल्ड्रिंक्समध्ये भरपूर कॅलरीज असतात, म्हणजेच त्यात कोणतेही पोषण नसते पण ते भरपूर कॅलरीज देतात. दररोज एक किंवा दोन ग्लास कोल्ड्रिंक पिल्याने अनावश्यक वजन वाढू शकते आणि लठ्ठपणा वाढण्यासोबतच इतर आजारांचा धोका देखील निर्माण होऊ शकतो.




## उन्हाळ्यात हे २ पेय आजारांना दूर ठेवतील, आहारात नक्की समावेश करा



सध्या सर्वत्र उकाडा सुरु आहे. उन्हाळ्यात अपचन, अतिसार आणि आम्लता या सारख्या आजारांचा धोका वाढतो. उन्हाळ्यात पित्तदोष देखील वाढते. पित्ताच्या विकारामुळे त्वचेवर पुरळ उठतात.

उन्हाळ्यात ज्यूस, कोल्ड्रिंक्स, स्मूदी, पिणे सर्वांनाच आवडते. हे चवीला चांगले लागते. पण आरोग्याच्या दृष्टीने चांगले नसते. या सर्व पेयांमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असते. उन्हाळ्यात रिफाईंड साखरेमुळे आपल्या शरीराला नुकसान करते. उन्हाळ्यात हे २ पेय शरीरासाठी आरोग्यवर्धक असते. हे पिणे फायदेशीर ठरते. हे २ पेये प्यायल्याने उन्हाळ्यातील आजार टाळता येतात. चला तर मग जाणून घेऊ या.

### डिटॉक्स पाणी

उन्हाळ्यात तापमान वाढते तसे काही आजारांचा धोका देखील वाढतो. अशा परिस्थितीत, उन्हाळ्याच्या दिवसात आपण दररोज डिटॉक्स वॉटर प्यावे. हे करण्यासाठी, तुम्हाला १ मातीचे भांडे किंवा मातीचा माठ घ्यावा लागेल. त्यात स्वच्छ पाणी भरा पाण्यात तुम्ही त्यात काकडी, बीट, पुदिना आणि लिंबू  घालू शकता. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही टरबूज सारखी हंगामी फळे देखील वापरू शकता. तुम्हाला हे पाणी रात्रभर किंवा ४-५ तासांसाठी ठेवावे लागेल. हे पेय दिवसभरात पाण्याऐवजी अधूनमधून प्या. यामुळे शरीर आतून स्वच्छ राहील आणि तुम्हाला उष्णता कमी जाणवेल.

### बीटरूट आणि ताक

उन्हाळ्यात आपण दह्यापासून बनवलेले पातळ ताक देखील सेवन केले पाहिजे. ताकामध्ये प्रोबायोटिक्स भरपूर प्रमाणात असतात. चांगल्या बॅक्टेरियांनी समृद्ध असलेले दही खाल्ल्याने आतड्यांचे आरोग्य चांगले राहते. हे बनवण्यासाठी तुम्हाला २ चमचे दही, अर्धा बीट आणि काळे मीठ घ्यावे लागेल. सर्व गोष्टी मिक्सरमध्ये घाला आणि बारीक करा आणि पेय तयार करा. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही त्यात हलके भाजलेले जिरे पावडर देखील घालू शकता.

हे दोन्ही पेये दररोज सेवन करता येतात. ते प्यायल्याने पचनशक्ती वाढते, जी उन्हाळ्यात बिघडते. हे प्यायल्याने हाडे आणि स्नायू मजबूत होतात. बीटरूट शरीरातील रक्ताची कमतरता दूर करते. त्वचा स्वच्छ होते आणि रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत होते.

## उन्हाळ्यात लिची खाण्याचे फायदे जाणून घ्या

उन्हाळ्यात लिची सहज उपलब्ध होते. आंब्यासह लिचीचे सेवन देखील केले जाते. उन्हाळ्यात आईस्क्रीम, रस, जेली, लिची घालून खातात. उन्हाळ्यात लिची खाण्याचे फायदे आहे. त्यात व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी६, नियासिन, रिबोफ्लेविन, तांबे, पोटॅशियम, फॉस्फरस, मॅग्नेशियम आणि मँगनीज सारखे महत्त्वाचे पोषक घटक आढळतात जे आपल्या शरीरासाठी फायदेशीर आहे. लिची खाण्याचे आरोग्यदायी फायदे जाणून घ्या.

### पचनसंस्था निरोगी ठेवते

लिचीमध्ये उच्च फायबर असते, जे पचनसंस्था सुधारण्यास मदत करते. उन्हाळ्यात, लोकांना अपचन, गॅस किंवा बद्धकोष्ठता यासारख्या पचनाच्या समस्यांचा सामना करावा लागतो. लिचीचे सेवन केल्याने या समस्यांवर मात करता येते आणि पचन क्षमता वाढते.

### भरपूर हायड्रेशन

कडक उन्हात शरीराला थंडावा देण्यासाठी लिची हा एक उत्तम पर्याय असू शकतो . यामध्ये भरपूर पाणी असते, जे शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढण्यास मदत करते. लिचीचे सेवन केल्याने शरीराला नैसर्गिक थंडावा मिळतो.

### हृदयाचे आरोग्य राखते

लिचीमध्ये पोटॅशियम आणि मॅग्नेशियमसारखे घटक असतात, जे हृदयाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. हे घटक रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करतात, ज्यामुळे हृदयाशी संबंधित समस्यांचा धोका कमी होतो. याव्यतिरिक्त, लिचीमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स रक्त प्रवाह सुधारतात, ज्यामुळे रक्तदाबाची समस्या कमी होते.

### व्हिटॅमिन सी समृद्ध

लिचीमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते आणि त्यात अँटीऑक्सिडंट्स देखील असतात जे शरीराची प्रतिकारशक्ती वाढवतात आणि संक्रमणांशी लढण्यास मदत करतात. उन्हाळ्यात शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होऊ शकते, म्हणून लिचीचे सेवन करणे फायदेशीर ठरू शकते.

### वजन कमी करण्यास उपयुक्त

लीचीमध्ये कॅलरीज कमी असतात, त्यामुळे ते वजन कमी करण्यासाठी एक आदर्श फळ आहे. त्यात फायबरचे प्रमाणही चांगले असते, जे पोट बराच काळ भरलेले ठेवते आणि जास्त खाण्यापासून रोखते. याशिवाय, लिचीमधील पाण्याचे प्रमाण चयापचय वाढविण्यास मदत करते, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

### त्वचा तजेल होते

लिची खाल्ल्याने त्वचेतील हायड्रेशन वाढते , ज्यामुळे कोलेजन उत्पादनात मदत होते. यामुळे बारीक रेषा आणि सुरकुत्याची समस्या कमी होते आणि व्यक्तीला कमी वयात वृद्धत्वाचा सामना करावा लागत नाही. लिचीमध्ये आढळणारे व्हिटॅमिन ई केवळ त्वचेला मॉइश्चरायझ करत नाही तर सनबर्न आणि जळजळ यासारख्या समस्या कमी करण्यास देखील मदत करते, त्यामुळे त्वचा स्वच्छ आणि चमकदार राहते.



## रात्री झोपण्यापूर्वी ओव्याचे पाणी प्या, या आजारांपासून आराम मिळेल

सध्या धकाधकीच्या जीवनात आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे, बदलत्या जीवनशैलीमुळे आणि खाण्यापिण्याच्या सवयीमुळे कमी वयातच मधुमेह, रक्तदाब, हृदयाचे आजार वाढत आहे. कामाचा स्वरूप बदलले आहे. ताणतणावमुळे अनेकदा आजाराला बळी पडतो. अशा परिस्थितीत ओव्याचे पाण्याचे सेवन करणे आरोग्याला फायदेशीर आहे. त्याचे फायदे आणि सेवन कसे करायचे जाणून घेऊ या.

### पचनसंस्था मजबूत करते

चुकीच्या खाण्या-पिण्याच्या सवयीमुळे गॅस, अपचन आणि बद्धकोष्ठता यासारख्या पचनाच्या समस्या खूप सामान्य आहेत. ओव्या मध्ये पचन सुधारणारे घटक असतात. हे अन्न लवकर पचण्यास मदत करते आणि गॅस तयार होण्यास प्रतिबंध करते. ओव्याचे पाणी पिल्याने तुमच्या पोटातील उष्णता कमी होते आणि पचनसंस्था निरोगी राहते. विशेषतः जर तुम्ही रात्री जड अन्न खाल्ले तर झोपण्यापूर्वी ओव्याचे पाणी प्यायल्याने फायदे मिळतील.

### रक्तातील साखर नियंत्रित करते

मधुमेह हा एक गंभीर आजार आहे जो हळूहळू शरीराच्या अनेक भागांवर परिणाम करतो. संशोधनानुसार, ओव्याचे पाणी रक्तातील साखर नियंत्रित करण्यास मदत करते. याच्या सेवनाने इन्सुलिनची पातळी संतुलित होते आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित होते. त्यामुळे रात्री झोपण्यापूर्वी ओव्याचे पाणी पिणे मधुमेही रुग्णांसाठी फायदेशीर ठरू शकते.

### त्वचेसाठी फायदेशीर

ओव्यात अँटीऑक्सिडंट्स देखील आढळतात जे सुरकुत्या, डाग आणि कोरडेपणा यासारख्या त्वचेच्या समस्या दूर करण्यास मदत करतात. ओव्याचे पाणी नियमितपणे प्यायल्याने त्वचा आतून हायड्रेटेड आणि चमकदार राहते. हे शरीरातील हानिकारक विषारी पदार्थ काढून टाकण्यास देखील मदत करते, ज्यामुळे तुमची त्वचा निरोगी दिसते.

### ओव्याचे पाणी कसे बनवाल

ओव्याचे पाणी बनवण्यासाठी एक चमचा ओवा घ्या आणि रात्रभर कोमट पाण्यात भिजवून ठेवा सकाळी गाळून ते पाणी रिकाम्यापोटी प्या रात्री झोपण्यापूर्वी प्यायचे असल्यास झोपण्यापूर्वी ३० मिनिटे आधी पिऊ शकता. ओव्याच्या पाण्याचे नियमित सेवन केल्याने आरोग्यदायी फायदे मिळतात.



## संपादकीय

# जातनिहाय जनगणनेचे महिला आरक्षण होऊ नये!




संपादक दिपक मोरेश्वर नाईक




जिसकी जितनी संख्या भारी, उसकी उतनी भागीदारी अशी घोषणा देऊन बहुजन समाज पार्टीचे संस्थापक कांशीराम यांनी उत्तर प्रदेशचे राजकारण बदलले. याच घोषणेचा आधार घेत काँग्रेसने देशामध्ये जातीय जनगणनेचा आग्रह धरला. त्यांची ही मागणी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने बुधवारी एक प्रकारे मान्य केली आहे. आगामी जनगणनेवेळी देशभरात जातीनिहाय जनगणना करण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेतील राजकीय विषयांच्या कॅबिनेट कमिटीने केली आहे. महिला आरक्षणाप्रमाणेच हा निर्णय ठरणार नाही, याची दक्षता आता केंद्र सरकारलाच घ्यावी लागणार आहे.

काश्मीरमधील पहलगामध्ये झालेल्या दहशतवादी हल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी सातत्याने उच्चस्तरीय बैठका घेत आहेत. त्यातच बुधवारी नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेतील राजकीय विषयांच्या कॅबिनेट बैठकीची माहिती समोर आली आणि आता केंद्र सरकार दहशतवादाविरोधात काहीतरी मोठा निर्णय घेणार, काही मोठी घोषणा करणार असे वाटत होते.

मात्र मोदी सरकारच्या राजकीय विषयक कॅबिनेटने बुधवारी अचानक जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला. कालपर्यंत भारतीय जनता पक्ष ज्या विषयाला हात लावण्यासही तयार नव्हता. जातीनिहाय जनगणना हा देशातील जातीजातींमध्ये फूट पाडण्याचा प्रकार असल्याची संभावना भाजप नेते आणि त्यांच्या आयटी सेलकडून होत होती.

काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या जातीनिहाय जनगणनेच्या मागणीवर टीका करण्यासाठी भाजपकडून सर्वच राजकीय शस्त्रास्त्र बाहेर काढली जात होती, आता त्याच भाजपप्रणित एनडीए सरकारच्या मंत्रिमंडळाने जातीनिहाय जनगणनेचा निर्णय घेतला आहे. हा भाजपच्या सामान्य कार्यकर्त्यांसह देशातील सर्वांसाठीच एक मोठा धक्का आहे.

कारण महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भाषणे आठवून पाहिली तर लक्षात येईल की, काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या जातीनिहाय जनगणनेच्या मागणीला प्रत्युत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कधी नव्हे ते उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या घोषणेचा आधार घेतला. आदित्यनाथांनी बटेंगे तो कटेंगे अशी घोषणा दिली.

पंतप्रधान मोदींनी याच घोषणेची सुधारीत आवृत्ती आणली, एक है तो सेफ है. महाराष्ट्र विधानसभेवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी ही घोषणा देण्यापूर्वी काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या जातनिहाय जनगणनेवर टीका करत. मोदींनी म्हटले होते की, मी फक्त चारच जाती मानतो, गरीब, शेतकरी, महिला आणि युवक, याच चार जाती देशात आहेत. जातीनिहाय जनगणनेला त्यांनी तेव्हा गरीब-श्रीमंत असे उत्तर दिले होते.

२०२४ लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनात लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जातीनिहाय जनगणनेची मागणी केली होती. याच सभागृहात जातीनिहाय जनगणनेचा निर्णय मान्य होईल आणि जातीनिहाय जनगणना झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास त्यांनी अवघ्या दहा-अकरा महिन्यांपूर्वी व्यक्त केला होता.

तेव्हा सत्ताधारी बाकांवरुन त्यांना प्रचंड विरोध झाला. भाजप खासदार आणि माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी तर त्यांच्यावर वैयक्तिक हल्लाबोल केला. मात्र तरीही राहुल गांधी यांनी त्यांची मागणी सोडली नाही. अखेर केंद्र सरकारला जातीनिहाय जनगणनेचा निर्णय घ्यावा लागला आहे. त्यांच्या या निर्णयाचे राहुल गांधींसह विरोधी पक्षातील सर्वांनी स्वागत केले आहे.

केंद्र सरकारने आताच हा निर्णय का घेतला, याचे उत्तर मात्र सध्यातरी कोणाकडेच नाही. पहलगामधील हल्ल्यानंतर दोनच दिवसांनी अर्थात २४ एप्रिल रोजी पंतप्रधान मोदी बिहारमध्ये जातात, राजकीय सभेला, एकाअथार्ने निवडणूक सभेला संबोधित करतात. त्यानंतर सहा दिवसांनी, ३० एप्रिल रोजी जातीनिहाय जनगणनेची केंद्रीय मंत्रिमंडळाकडून घोषणा होते. यामुळे या निर्णयाला याच वर्षी होर्णाया बिहार विधानसभा निवडणुकीची पार्श्वभूमी कारणीभूत मानली जात आहे.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारच्या जातनिहाय जनगणनेच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. अखेर आमचा मुद्दा केंद्र सरकारला मान्य करावा लागला, असे त्यांनी म्हटले आहे. केंद्र सरकारच्या बुधवारच्या घोषणेआधी काँग्रेसने कर्नाटक आणि तेलंगणात जातनिहाय जनगणना केली आहे.

बिहारमध्ये नितीशकुमार आणि भाजप एकत्र असतानाच जातनिहाय जनगणनेचा निर्णय २०२२ मध्ये झाला होता. या निर्णयाची अंमलबजावणी आणि आकडेवारी मात्र नितीशबाबूंनी भाजपला सोडचिठ्ठी देऊन काँग्रेस आणि लालू यादवांच्या राष्ट्रीय जनता दलासोबत घरोबा केल्यानंतर महागठबंधन सरकारने २०२३ मध्ये जाहीर केली होती. या आकडेवारीनुसार महागठबंधन सरकारने आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादाही ओलांडत ६५ टक्के आरक्षणाचा निर्णय घेतला होता.

या निर्णयाला पाटणा उच्च न्यायालयाने स्थगिती दिली, सर्वोच्च न्यायालयानेही ही स्थगिती हटवलेली नाही. तेव्हापासूनच जातनिहाय जनगणनेची मागणी अधिक जोरकसपणे पुढे आली. २०२४ लोकसभा आणि त्यानंतर महाराष्ट्र विधानसभेत या मागणीला अधिक धार मिळाली.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसेदत म्हटले होते की, तुम्ही कोणाकोणाचा अंगठा कापला आहे. ते या जनगणनेच्या माध्यमातून समजून येईल. राहुल गांधींनी फक्त जातनिहाय जनगणनेची मागणी केलेली नाही. त्यांना फक्त ओबीसींचा आकडा नको आहे, तर त्यांनी सरकारी योजना, नोकरी, संपत्ती यामध्ये मागासवर्गीय, आदिवासी आणि ओबीसी आणि खुल्या प्रवगार्तील लोकांची किती भागिदारी आहे याचेही आकडे पाहिजे.

कोणाकडे किती संपत्ती आहे आणि कोण वषार्नुवर्षे हक्क, अधिकार, समतेच्या तत्वापासून कंगाल राहिले आहे. ते कोणत्या जात समूहातील आहेत. अधिकार आणि संपत्तीचे केंद्रीकरण कोणत्या जातींमध्ये झाले आहे, त्याचाही डेटा तयार झाला पाहिजे. तरच खर्या वंचितांना लाभ पोहचवता येईल, अशी त्यांची भूमिका आहे. हा समाजाचा एक्स-रे आहे. त्यासाठी जातनिहाय जनगणनेची मागणी होत आहे.

यासाठी राहुल गांधींनी अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी होर्णाया हलवा सेरेमनीचा फोटो संसदेत दाखवला होता. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासोबतच्या फोटोमध्ये एकही दलित, आदिवासी एवढंच काय ओबीसी सचिवदेखील नाही, हे त्यांनी दाखवून दिले होते. जर देर्णायांमध्ये या समुदायातील एकही व्यक्ती नसेल तर त्यांच्या समाजाच्या वाट्याला अर्थसंकल्पातून काय मिळणार, असा रोकडा सवाल त्यांनी केला होता. त्यानंतर हलवा सेरेमनीचे फोटो येणेच बंद झाले.

वास्तविक जातनिहाय जनगणनेवर याच सरकारने २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयात शपथपत्रावर सांगितले होते की, २०११ मध्ये करण्यात आलेल्या सामाजिक, आर्थिक आणि जातनिहाय जनगणनेतील आकडेवारी ही चुकीची आहे. त्यामध्ये अनेक चुका झाल्या होत्या. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्राचे उदाहरण दिले होते.


१९३१ मध्ये करण्यात आलेल्या जनगणनेत महाराष्ट्रात अधिकृत अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसीमध्ये येर्णाया जातींची संख्या ४९४ सांगितली गेली होती. मात्र २०११ मधील जनगणनेत महाराष्ट्रातील या जातींची संख्या ४,२८,६७७ आढळून आली आहे. त्यामुळे जातीय जनगणना करणे कठीण असल्याचे याच सरकारने सर्वोच्च न्यायलयात सांगितले होते. आता तेच सरकार जातनिहाय जनगणनेचे शिवधनुष्य कसे पेलणार, हाही प्रश्नच आहे.

आता राहिला मुद्दा जनगणना केव्हा होणार? खरं तर जनगणना २०२१ मध्येच व्हायला पाहिजे होती. मात्र तेव्हा कोरोनाचे कारण पुढे करत जनगणना करण्यास केंद्र सरकारने नकार दिला. कोरोना संपल्यानंतर जनगणना होण्यात कोणतीही अडचण नव्हती. मात्र तरीही गेल्या पाच वर्षांत जनगणनेकडे मोदी सरकारने ढुंकूनही पाहिले नाही. २०२४ मध्ये सांगितले गेले की, यावर्षी निवडणूक आहे, त्यामुळे जनगणना झाली नाही.

पुढील वर्षीही जनगणना होण्याची शक्यता नाही. कारण या वर्षाच्या अर्थसंकल्पात त्यासाठीची आर्थिक तरतूदच नाही. जनगणनेसाठी फक्त ५७४ कोटींची घोषणा केली आहे. मागील अर्थसंकल्पीय तरतुदीच्या तुलनेत (१३४१ कोटी) हा आकडा अर्धा देखील नाही. त्यामुळे २०२५ या वर्षात जनगणना होणे शक्य दिसत नाही. जनगणना केव्हा होणार हे आधी सरकारने स्पष्ट करण्याची गरज आहे. त्यानंतरच जातीनिहाय जनगणनेची त्यांची मनिषा किती प्रामाणिक आहे, हे स्पष्ट होणार आहे.

अन्यथा ज्याप्रमाणे महिला आरक्षणाची घोषणा लोकसभा निवडणुकीपूर्वी झाली, मात्र ते आरक्षण लागू केव्हा होणार हे अजूनही निश्चित नाही. तसेच काही जातनिहाय जनगणनेबाबत होणार नाही, याची काय शाश्वती. जनगणना होईलदेखील, मात्र आरक्षणाचे ५० टक्के मयार्देचे त्यानंतर काय करणार हेही अजून केंद्र सरकारने स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे आताही घोषणा झाली आहे, चचेर्ला सुरुवात झाली आहे. तेव्हा यातून सकारात्मक काय बाहेर येते याची अजूनतरी वाटच पाहावी लागणार आहे.

# ‘गझवा ए हद’ला उत्तर द्यावे



भारत आपल्या संस्कृतीप्रमाणे युद्धनीती आखतो. आजही आपल्यातील तो भाव जिवंत आहे. मात्र आता उघडपणे धोरणात्मक बदल करणे गरजेचे असल्याचे ताज्या दहशतवादी हल्ल्याने दाखवून दिले आहे. थोडक्यात, आता आपण पाकिस्तानचे तुकडे करण्याच्या उद्दिष्टावर काम करणार आहोत असे स्पष्ट सांगण्याची वेळ आली आहे. देशाचे अस्तित्वच संकटात आल्याचे समजले तर पाकिस्तान दहशतवाद्यांना मदत करणे बंद करेल.

पाकिस्तानसंदर्भात अगदी १९४७ पासून आपले धोरण चुकीचे राहिले आहे. भारताप्रमाणेच पाकिस्तानलाही आपल्या देशातील लोकांची काळजी आहे आणि आर्थिकदृष्ट्या पाकिस्तान समृद्ध व्हावा यासाठी तेथील सरकार आपल्या सरकारप्रमाणेच काम करेल, अशी भाबडी आशा आपण गेली ७५ वर्षे बाळगून आहोत. इतिहासाचा दाखला घेतला, तर १९४७ मध्ये पाकिस्तानमध्ये आर्थिक सुबत्ता होती. तेथील जनतेचे राहणीमान बाकी भारतापेक्षा चांगले होते. तसेच पाकिस्तानी नागरिकांचे दरडोई उत्पन्न भारताच्या दुप्पट होते. पण या ७५ वर्षांनंतर पाकिस्तानी जनता सर्वसामान्य भारतीय नागरिकांपेक्षा गरीब झाली आहे तसेच त्यांचे दरडोई उत्पन्न भारतीयांच्या उत्पन्नाच्या निम्मेदेखील नाही, हे वास्तव आहे. आज पाकिस्तान भिकेला लागण्याचे मुख्य कारण म्हणजे या देशाचे उद्दिष्ट्य युद्ध आणि काश्मीर काबीज करणे हेच आहे. जनतेच्या आर्थिक विकासाला त्यांनी कधीच प्राथमिकता मानले नाही. उत्तर भारताच्या इतिहासाकडे नजर टाकली, तर दिल्लीचे सुलतान आणि नंतरचे मोघल साम्राज्य यांनीही हेच केल्याचे दिसते. त्याचाच कित्ता पाकिस्तान गिरवत आहे. खेरीज इस्लामी धार्मिक शिकवणीप्रमाणे भारताला ‘गझवा ए हद’ म्हणजे पादाक्रांत करून त्याचे संपूर्ण इस्लामीकरण करणे हे प्रत्येक मुस्लिमाचे कर्तव्य आहे, असेच मानले जाते. काश्मीर हे केवळ निमित्त आहे; परंतु संपूर्ण हिंदुस्तान पादाक्रांत करणे हेच पाकिस्तानचे जन्मापासूनचे उद्दिष्ट्य राहिले आहे. मात्र दुदैर्वाने भारताच्या नेतृत्वाला आजपर्यंत या मूलभूत प्रश्नाची समज आलेली नाही. पंडित नेहरू, लालबहादूर शास्त्री, अटलबिहारी वाजपेयी, इंदिरा गांधी आणि अगदी पंतप्रधान मोदी आदींनी कधी ना कधी पाकिस्तानशी शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. पण या मूलभूत धार्मिक धोरणेमुळे पाकिस्तान भारताशी कधीच शांतता ठेवणार नाही, हे भारतीयांना आजपावेतो समजलेले नाही.

जनरल मुशर्रफ कारगील युद्धावेळी पाकिस्तानचे हुकूमशहा होते. त्यांनी सत्तेतून पायउतार झाल्यानंतर एकदा म्हटले होते की, काश्मीर प्रश्न पाकिस्तानच्या मनाप्रमाणे सुटला तरी भारत-पाकिस्तानात शांतता नांदणे शक्य नाही. त्यामुळेच भारतीयांची एकूणच युद्ध आणि त्याचा उपयोग याबद्दलची मनोवृत्ती आणि धारणा अजूनही श्रीरामाच्या काळातील सत्ययुगात अडकलेल्या आहेत, असे म्हणावे लागेल. भारतीय इतिहासाकडे डोळसपणे पाहिले तर जाणवते की, परकीय आक्रमणांसमोर आपण कधीच टिकाव धरू शकलो नाही. अर्थातच याला आपापसातली भांडणे आणि राजकीय ऐक्याचा अभाव कारणीभूत आहे; परंतु, त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे अगदी महाभारत काळापासून भारतीय युद्धाकडे ‘सीमित युद्ध’ अशाच भावनेने पाहतात. दुसरीकडे, परकीय आक्रमक संपूर्ण युद्ध आणि शत्रूचा संपूर्ण विनाश या उद्दिष्टाने लढतात. या मूलभूत फरकामुळे वैयक्तिक शौर्य असूनही धर्मयुद्धाच्या कालबाह्य कल्पनांमुळे भारतीय अनेक लढाया हरत राहिले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सोळाव्या शतकात या ऐतिहासिक चुकीला तिलांजली देऊन हदवी साम्राज्य स्थापन केले. जवळपास ५०० वर्षांनंतर महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी आक्रमकांवर निर्भेळ विजय मिळवले. राजपूतांचा सर्व भर वैयक्तिक शौर्यावर असे. यापुढचे पाऊल म्हणजे विजय मिळवण्याऐवजी हौतात्म्य पत्करण्याचीच फुशारकी मिरवली जाऊ लागली. आज पाकिस्तानशी सामना करताना पुन्हा एकदा शिवाजी महाराजांनी शिकवलेला धडा गिरवण्याची गरज आहे. आज भारतीयांनी मनाशी खूणगाठ बांधण्याची गरज आहे की, पाकिस्तानचे राष्ट्रीय उद्दिष्ट भारतावर कब्जा करणे आणि संपूर्ण भारत इस्लाममय करणे हेच आहे. पाकिस्तानच्या मते शांतता ही तात्पुरती सोय असते. यामुळे भारताला पाकिस्तानी आव्हानाचा यशस्वी सामना करायचा असेल, तर पाकिस्तान पूर्णपणे नष्ट करणे हे राष्ट्रीय उद्दिष्ट ठेवण्याखेरीज पर्याय नाही. एकदा हे राष्ट्रीय उद्दिष्ट सर्वसंमत झाले की त्यानंतर देशाचे धोरण, रणनीती आणि डावपेच आपोआपच बदलतील. नेहमीप्रमाणे पहलगामचा हल्ला झाल्यानंतर ही गुप्तहेर तंत्राची चूक होती, अशी आवई उठवली गेली; परंतु गुप्तहेर संस्थांना दोष देणारे लोक विसरतात की, गेल्या ३० वर्षांमध्ये काश्मीरमध्ये पर्यटकांवर कधीच हल्ले झालेले नाहीत. पहलगाममध्ये ज्या प्रकारे एका आडबाजूला अनेक पर्यटक गेले होते तसेच मी स्वतः दोन वर्षांपूर्वी पत्नीसह सोनमर्गजवळ अशाच एका ठिकाणी गेलो होतो. तेथेही जाण्यास घोड्यावरून प्रवास करावा लागला होता आणि आमच्यासारखे असेच शंभरभर पर्यटक तेव्हा तेथे होते. पहलगामप्रमाणेच त्या ठिकाणीदेखील आमच्याबरोबर कोणीही पोलीस किंवा सैनिक नव्हते. आम्ही फिरत होतो तेथून जवळची सैनिक चौकी पहलगामप्रमाणेच दहा किलोमीटर दूरवर होती. त्यामुळे पहलगामच्या पर्यटनस्थळावर पोलीस नसणे ही काही नवी गोष्ट नाही. फरक हा की, आजपर्यंत पाळली जाणारी लक्ष्मणरेषा यावेळी पाकिस्तानने आणि पाक दहशतवाद्यांनी पार केली आहे. अर्थातच या आगळिकीसाठी पाकिस्तानला धडा शिकवणारी कारवाई होणे गरजेचे आहे.

आता सिंधू जलसंधी निलंबित करून भारताने पाकिस्तानच्या मर्मावर घाव घातला आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये हिमालयातले बर्फ वितळून सिंधू आणि इतर नद्यांमध्ये पाणी येते आणि त्यावरच पाकिस्तानची तहान भागते. सध्या भारताकडे चिनाब आणि झेलम नदीवर जलविद्युत प्रकल्प असून त्यात उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये पाणी साठून आपण पाकिस्तानमध्ये जाणारा ओघ कमी करु शकतो. याउलट, पावसाळ्यात पूर आले असताना साठवलेले अधिक पाणी सोडून तेथील पूरस्थिती आणखी गंभीर करू शकतो.

गेल्या महिनाभरापासून काश्मीरला जोडणारा रेल्वेमार्ग तयार आहे. एकदा तो सुरू झाला की काश्मिरी लोकांची खूप सोय होणार आहे कारण त्यांच्याकडे होणाऱ्या फळे तसेच इतर उत्पादनाचा वाहतूक खर्च निम्म्यावर येणार आहे. अर्थातच त्यामुळे काश्मीरमध्ये आर्थिक सुबत्ता निर्माण होईल, यात शंका नाही. एकदा एखाद्या प्रदेशात आर्थिक सुबत्ता निर्माण झाली की तेथील लोक सहजसहजी हसाचाराला उद्युक्त होत नाहीत. पाकिस्तानला नेमकी हीच भीती सतावत आहे. म्हणूनच त्यांनी पहलगामची घटना घडवून आणली. गेल्या अनेक महिन्यांपासून गुप्तहेर संघटनांना याची कुणकुण आहे. त्यामुळेच तयार होऊनही श्रीनगरची रेल्वेसेवा सुरू करण्यात आलेली नाही. पाकिस्तानी अतिरेक्यांचा पूर्ण बिमोड केल्याखेरीज ही रेल्वेसेवा सुरू केली, तर त्यावर दहशतवादी हल्ले होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे पहलगाम हल्ल्याच्या निमित्ताने पाकिस्तानमधील दहशतवादाची पाळेमुळे नष्ट करण्याची संधी मिळाली आहे.

पाकिस्तानचा पंजाब प्रांत दहशतवादाची जननी आहे. पाणी तोडल्यामुळे सगळ्यात जास्त परिणाम पंजाबवर होणार आहे. आपल्या सैन्याने चालवलेल्या दहशतवादामुळे ही परिस्थिती झाली आहे, अशी जाणीव पाकिस्तानी पंजाबात होईल तेव्हा तेथील लोकच सैन्याविरुद्ध उठाव करतील. मात्र यासाठी भारताने उघडपणे धोरणात्मक बदल करणे गरजेचे आहे. थोडक्यात, आता आपण पाकिस्तानचे तुकडे करण्याच्या उद्दिष्टावर काम करणार आहोत असे उघडपणे सांगण्याची वेळ आज आली आहे. असे झाल्यास आपल्या देशाचे अस्तित्वच संकटात आल्याचे समजल्यावर पाकिस्तान दहशतवाद्यांना मदत करणे बंद करेल का, या प्रश्नाचे उत्तर मिळू शकेल.

# दहशतीला पुरून उरायला हवे

पहलगाम हल्ल्यानंतर काश्मिरमधल्या पर्यटकांनी परतीचा रस्ता धरला होता. त्यामुळे जवळपास ९० टक्के पर्यटक देशाच्या विविध भागात परतले होते आणि परतत आहेत, असे असताना काश्मिरमध्ये पर्यटनासाठी पुन्हा जायला हवे, असाही एक सूर येत आहे. भारताच्या ताब्यात असलेला काश्मिरचा अविभाज्य भाग भारताच्या आणि इथल्या नागरिकांच्या मालकीचा आहे. राज्यघटनेने नागरिकांना देशाच्या कोणत्याही भागात ज्या भागात लष्कर किंवा सुरक्षा यंत्रणांनी मनाई केलेली नाही, अशा भागात पर्यटनासाठी जाण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. या स्वातंत्र्याचा विचार करून काश्मीर पुन्हा पर्यटकांनी फुलायला हवे, या ठिकाणचा पर्यटन उद्योग पुन्हा बहरायला हवा, त्यासाठी व्यक्ती आणि संस्थांनी पुढाकार घ्यायला हवा. काश्मिरमध्ये दहशत पसरवून हा प्रदेश निर्मनुष्य करण्याचे दहशतवाद्यांचे मनसुबे हाणून पाडण्यासाठी अभिनेते अतुल कुलकर्णी पहलगाममध्ये दाखल झाल्यानंतर त्यांच्यावर होणारी टीका ही दहशतवाद्यांच्या कटाला बळ देणारी आहे. सद्यस्थितीत या हल्ल्यामागील कच्चे दुवे आणि त्यामागील कारणे शोधायला हवी. हा हल्ला होण्यामागे असलेल्या स्थानिक आणि परकीय शक्तींची माहिती घेऊन ती सार्वजनिक व्हायला हवी. केंद्र आणि संबंधित यंत्रणांनी लोकांना विश्वासात घेऊन संशयाचे मळभ दूर करायला हवे. ‘पाणी बंद केले’ असे तत्सम प्रकारातले प्रचारकी दिलासे आता उपयोगाचे नाहीत. सोबतच भारतीयांना स्पिरीटच्या नावाखाली हतबल करण्याच्या पलीकडे ही स्थिती गेलेली आहे. एखादी परिस्थिती हाताबाहेर गेल्यावर त्याविरोधात लढण्याऐवजी त्यासोबत तडजोड करून नाईलाजाने राहावे लागते, याला देशवासीयांचे स्पिरीट असे गोंडस नाव दिले जाते. मुंबई, दिल्ली किंवा देशाच्या इतर भागात झालेल्या दहशतवादी हल्ल्यांना चोख उत्तर द्यायलाच हवे, सोबतच असे हल्ले का झाले, का होत आहेत? यातील लूप होल्स शोधायला हवेत. माध्यमांनी हल्ल्यानंतर हिंदू-मुसलमान करण्यापेक्षा हा हल्ला झालाच कसा? सुरक्षा किंवा संबंधित यंत्रणा आणि सरकार काय करत होते? असे तिखट प्रश्न राज्यकर्त्यांना विचारायला हवे, जे होताना दिसत नाही. देशाच्या विविध भागात दहशतवादी हल्ले झाल्यानंतर निर्माण होणारी देशभक्ती आणि ऐक्याच्या वातावरणाआड आपला कमकुवतपणा लपवता येणार नाही. हल्ला झाला हे सत्य आहे, २६ नागरिकांचा यात बळी गेला हेही सत्य आहे. याआधीही असे हल्ले झाले होतेच. उरी लष्करी तळावर झालेल्या हल्ल्यानंतर झालेला सर्जिकल स्ट्राईक वगळता भारताने दहशतवादाला ठोस उत्तर दिलेले लोकापर्यंत पोहचलेले नाही. पुलवामा हल्ल्याबाबत राजकीय संशय व्यक्त केला जात आहे. देशात महाराष्ट्राने चार वेळेस दहशतवादी हल्ले पचवले आहेत. त्यानंतरही ठोस काही हाती लागले असेही म्हणता येणार नाही. मुंबईवर झालेल्या पहिला दहशतवादी हल्ल्याला तीन दशके उलटून गेली आहेत. याकुब मेमनचा देहदंड त्यानंतर टायगर मेमन आणि त्याच्या साथीदारांपर्यंत भारतीय सुरक्षा यंत्रणांना अद्याप पोहचता आलेले नाही. मोस्ट वाँटेड दाऊदच्या मुसक्या आवळून त्याला भारतात आणण्याची आश्वासनेही केव्हाच हवेत विरून गेली आहेत. संसद भवनावरील हल्ल्यालाही २५ वर्षे उलटली आहेत, यातील मास्टरमाईंड भारताच्या ताब्यात आले का? मुंबईतील ११ जुलै २००६ रोजीच्या रेल्वे बॉम्बस्फोटात २०० जणांचा मृत्यू झाला होता. मुंबईवरील २६-११ हल्ल्यानंतरही अशीच भावनिक लाट पाहायला मिळाली मात्र ठोस उपाययोजनांचा विषय कालांतराने विस्मृतीत गेला. हे दहा दहशतवादी सागरी मार्गाने मुंबईत दाखल झाले, त्यानंतर आजही मुंबई आणि महाराष्ट्राच्या सागरी सीमा सुरक्षित आहेत का? हा प्रश्न कायम आहे. पुणे जर्मन बेकरी बॉम्बस्फोट, उरी लष्करी तळावरील हल्ला त्यानंतर पुलावामा येथे लष्करी वाहनांवर झालेला मोठा हल्ला आणि आता पहलगाम बैसरन व्हॅलीत नुकताच झालेला दहशतवादी हल्ला... काश्मिरचे पर्यटकांचे नंदनवन पुन्हा गजबजण्यासाठी पर्यटक आणि भारतीयांच्या सुरक्षेची हमी देणारी यंत्रणा गरजेची आहे.



## शहापूर तालुक्यात महिलांची पाण्यासाठी वणवण
## टँकर सेवा अपुरी, पाण्यासाठी प्रचंड हालअपेष्टा

**■शहापूर :** ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली असून ढाकणे ग्रामपंचायतीच्या दोपरवाडी आणि चिंध्याचीवाडी या गावांमध्ये परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. या गावांतील ग्रामस्थांना पाण्यासाठी प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. महिला, मुले आणि वृद्धांसह सर्वांना दररोज डोक्यावर तीन-तीन हंडे घेऊन एक ते दोन आणि काही ठिकाणी तीन किलोमीटरपर्यंतचा खडकाळ आणि डोंगराळ रस्ता पार करावा लागतो. इतकेच नाही तर ७ ते ८ महिन्यांच्या गर्भवती महिलांनाही पाणी मिळवण्यासाठी आपला जीव धोक्यात घालावा लागत आहे. शहापूर तालुक्यातील लोकसंख्येत आदिवासींचे मोठे प्रमाण आहे. कसारा, खर्डी, शिरोळ, अजनुप तसेच आदिवासी पाडे जसे की दांड, उंबवणे, वाशाळा, रुईची, बिबलवाडी, खड्याचा पाडा, कलशेत परांड, नारळवाडी ही गावे डोंगराळ आणि दुर्गम भागात वसलेली आहेत. अशा भागांमध्ये टँकरने पाणी पोहचविणे कठीण असल्यामुळे पाण्यासाठीची धडपड अधिकच वाढली आहे. या भीषण परिस्थितीमुळे शहापूर तालुक्यात राजकीय वातावरण तापले आहे. विरोधी पक्षांनी सत्ताधारी आमदार आणि स्थानिक प्रशासनावर निष्क्रियतेचा आरोप केला आहे. ''शहापूर तालुक्यातून मुंबईसारख्या महानगराला लाखो लिटर पाणी पुरवले जाते, मात्र येथील लोकांना एक हंडा पाण्यासाठी देखील जीव धोक्यात घालावा लागतो,'' अशी टीका स्थानिकांनी केली आहे. तर सत्ताधाऱ्यांनी पाणीटंचाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचा दावा केला आहे. काही ठिकाणी नवीन बोअरवेल आणि विहिरी खोदण्याची कामे सुरू असून, दीर्घकालीन उपाययोजना राबवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. शहापूरचा पाण्यासाठीचा संघर्ष आजही कायम आहे. एकीकडे लाखो लिटर पाणी मुंबईला जात असताना, दुसरीकडे त्याच शहापूरमधील गावकरी डोक्यावर हंडे घेऊन डोंगराळ रस्त्यांवरून पाण्यासाठी वणवण फिरत असल्याचे विदारक चित्र पहावयास मिळत आहे.

**एक हंडा पाण्यासाठी जीव धोक्यात**

सध्या जिल्हा परिषद शहापूरजवळील भातसा नदीतून तालुक्यातील सुमारे ९६ गावांना टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरवते. मात्र, ही टँकर सेवाही अपुरी पडते आहे. टँकरमधून आलेले पाणी डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या विहिरींमध्ये सोडले जाते. या विहिरी डोंगराच्या उंचावर राहणाऱ्या गावांपासून खूप दूर असल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी उतरती-चढती वाट पार करत खडतर प्रवास करावा लागतो. परिणामी थकवा, दुखापती आणि आजारपणाची समस्या वाढत आहे.

## तापमानात अनपेक्षित घट, सोबत पावसाचे संकेत




**■मुंबई :** केंद्रीय हवामानशास्त्र विभाग अर्थात आयएमडीनं देशभरातील हवामानाचा प्राथमिक अंदाज वर्तवताना पुढील २४ तासांमध्ये देशातील उत्तर प्रदेश आणि बिहारच्या काही भागांसह पश्चिम बंगालमध्ये पावसाच्या हलक्या सरींची शक्यता वर्तवली आहे. तर, इथं महाराष्ट्राच्या उत्तरेकडील जिल्ह्यांमध्ये होरपळ कायम असतानाच विदर्भ आणि नजीकच्या भागांमध्ये मात्र तापमानात अनपेक्षित घट नोंदवण्यात आली आहे. हवामान विभागानं वर्तवलेल्या प्राथमिक अंदाजानुसार पूर्व विदर्भात पुढील २४ तासांमध्ये वादळी पावसाची शक्यता असून, इथं सोसाट्याच्या वाऱ्यांसह पवासाचा यलो अलर्टही जारी करण्यात आला आहे. मराठवाड्यात उष्ण आणि दमट हवामानाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सध्या राजस्थानच्या नैऋत्येपासून नजीकच्या भागावर चक्राकार वाऱ्यांची निर्मिती होत आहे. परिणामस्वरुप उत्तर मध्य महाराष्ट्रात कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाला असून, त्याच पश्चिम विदर्भ आणि कर्नाटक ते केरळदरम्यानच्या कमी दाबाच्या पट्ट्याचीही भर पडत आहे. या संपूर्ण प्रणालीमुळं महाराष्ट्रात एकाएकी तापमानात घट नोंदवण्यात आली आहे, ज्यामुळं नागरिकांना किमान दिलासा मिळताना दिसत आहे.

## प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी पालिकेची यंत्रणा सरसावली



**■विरार :** वसई- विरार शहराचे वाढते प्रदूषण त्यात मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य पसरले आहे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पालिकेची यंत्रणा सरसावली असून पालिकेच्या नऊ प्रभागात फिरत्या मशिनच्या माध्यमातून पाण्याचा फवारा मारला जात आहे. यामुळे धूळनियंत्रण केले जाणार असल्याचे पालिकेच्या अधिकार्यांनी बोलताना सांगितले. शहरातील प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी वसई- विरार महापालिकेने फॉग कॅनन यंत्रे आणली आहे. या यंत्राद्वारे पाण्याच्या थेंबाचा फवारा करून हवेतील धूळकरण नियंत्रित केले जात आहेत. पहिल्या टप्प्यात ५ फॉग कॅनन वाहने आणली असून ती प्रभाग निहाय धूळनियंत्रणाचे काम करत आहेत. वसई- विरार शहरामध्ये झपाट्याने नागरीकरण वाढू लागले आहे. रस्त्यावरील वाढती वाहतूक, विविध ठिकाणी सुरू असलेले बांधकामांचे प्रकल्प, विविध विकासकामे यामुळे शहरात प्रदूषण वाढू लागले आहे. या वाढत्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. त्यामुळे वसई- विरार पालिकेने विविध उपाययोजना सुरू केल्या आहे. त्याचाच एक भाग म्हणून फॉग कॅनन यंत्र आणले आहे. या यंत्रांची किंमत ३ कोटी २० लाख इतकी आहे. शासनाच्या राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत (नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम) ही यंत्रे खरेदी करण्यात आली आहेत. फॉग कॅनन यंत्रात १० हजार लीटर क्षमतेची पाण्याची टाकी आहे. या यंत्रातून त्यात पाणी साठवून सूक्ष्म आकाराच्या नोझल्समधून पाण्याच्या थेबांची फवारणी हवेत केली जाते. पाण्याची फवारणी वर्दळीचे रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, अंतर्गत रस्ते अशा ठिकाणी करून हवेतील नियंत्रण जात आहे. त्यामुळे वातावरणात असलेली धूळ नियंत्रित होते. वाढत्या धुळीने दुभाजक, दुभाजकांमध्ये लावण्यात आलेली झाडे ही धुळीने भरून जातात. त्याची देखील या फॉग कॅनन यंत्राच्या द्वारे स्वच्छता करता येणार आहे.

## ओसी नसलेल्या इमारतीत पालिकेचे प्रभाग कार्यालय
## मागील १४ वर्षांपासून इमारतीचा व्यावसायिक वापर




**दहा वर्षांत अग्निशमन व प्रतिबंधात्मक अहवाल नाही**

नियमाप्रमाणे ओसी असल्याशिवाय कोणालाही फायर एनओसी देता येत नाही. परंतु या इमारतीचे बांधकाम झाल्यानंतर प्राथमिक फायर एनओसी देताना अग्निशमन विभागाकडून अस्तित्वात असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार या इमारतीस स्वतंत्र नियंत्रण कक्ष पुरवणे बंधनकारक असल्याचे तसेच स्थायी अग्निशमन व प्रतिबंधात्मक यंत्रणा कार्यान्वित असल्याबाबतचा अहवाल वषार्तून दोनदा अग्निशमन विभागास सादर करणे बंधनकारक असल्याचे सांगितले होते. परंतु मागील दहा वर्षांत असा कुठल्याही प्रकारचा अहवाल सादर करण्यात आलेला नाही व सद्यस्थितीत या इमारतीची अग्निशमन यंत्रणाच योग्य प्रकारे कार्यान्वित नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

**■ठाणे :** इमारतीला ओसी (ओक्युपेशन सर्टिफिकेट) नसताना देखील ठाणे महापालिका मागील १४ वर्षांपासून इमारतीचा व्यावसायिक वापर करीत असल्याची गंभीर बाब उघड झाली आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या या इमारतीमध्ये भाजी मंडई, व्यावसायिक गाळे व ठाणे महानगरपालिकेचे प्रभाग समिती कार्यालय तसेच दुय्यम निबंधक कार्यालय व इतर कार्यालये मनमुक्तपणे सुरू असल्याचे ठाणे काँग्रेसचे प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी उघडकीस आणले. ओसी नसतानाही एखाद्या इमारतीचा पालिका प्रशासन वापर करत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पालिकेच्या या मनमानी कारभाराविरोधात प्रश्नचिन्ह उपस्थित करत या सर्व प्रकरणाची चौकशी करून जे कोणी दोषी अधिकारी असतील त्यांच्यावर कडक कारवाईची मागणी ठाणे काँग्रेसचे प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी पालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेत केलेली आहे.

ठाणे नौपाडा परिसरात गावदेवी मार्केट (गावदेवी भाजी मंडई) ही व्यावसायिक इमारत ठाणे महानगरपालिकेकडून २०१४ साली बांधण्यात आली. शहराच्या मध्यवर्ती भागात वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या या इमारतीच्या बेसमेंटला दुचाकी वाहनांची पार्किंग तळमजल्यावर भाजी मंडईसह (भाजीपाला दुकाने) इतर व्यावसायिक गाळे व वरील मजल्यावर ठाणे महानगरपालिकेचे नौपाडा कोपरी प्रभाग समिती कार्यालय, तसेच दुय्यम निबंधक कार्यालय व इतर कार्यालये असल्याने दररोज हजारो लोकांची येजा या ठिकाणी असते. परंतु या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र अर्थात ओसीच (ओक्युपेशन सर्टिफिकेट) नाही. ओसी असल्याशिवाय बिल्डर वा मालक कुणालाही इमारतीचा-घराचा ताबा देऊ शकत नाही, असे झाल्यास हा गुन्हा मानला जातो, असे असतानाही ठाणे महापालिका स्वतःच्या मालकीच्या ओसी नसलेल्या इमारतीचा व्यावसायिक वापर मागील दहा वषार्पासून सर्रासपणे करत आहे.

या इमारतीतील तळ मजल्यावरील गाळे पुनर्वसन स्वरूपात भाजी मंडईसाठी दिलेले आहेत. परंतु भाजीविक्री न करता मोठ्या प्रमाणात येथील गाळ्यांच्या वापर कपड्यांच्या दुकानांसाठी केला जात आहे. तळमजल्यावर मोठ्या प्रमाणात कपड्याची दुकाने असल्याने आग लागल्यास मोठ्या प्रमाणात हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या ठिकाणचे अनधिकृत बांधकाम शहर विकास विभागाची पूर्वपरवानगी न घेता स्थावर मालमत्ता विभागाने पुनर्वसन स्वरूपात दिले असल्यास एक प्रकारे गाळेधारकांची देखील केलेली फसवणूक आहे. त्यामुळे या पद्धतीने महानगरपालिकाच आत बाहेर येण्याच्या जिन्याच्या मार्गात अनधिकृत बांधकाम करून पुनर्वसन कसे काय करू शकते? असा सवाल ठाणे काँग्रेसचे प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी उपस्थित करत या सर्व प्रकरणाची चौकशी करून जे कोणी दोषी अधिकारी असतील त्यांच्यावर कडक कारवाईची मागणी पालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेत केलेली आहे.

## खवल्या मांजरांच्या तस्करीचं म्यानमार कनेक्शन... दलालांना लगाम कसा लागणार?



**■ठाणे :** दुर्मिळ खवल्या मांजराची जालन्यात मोठ्या प्रमाणात तस्करी सुरूये.आणि पोलिस तपासात तस्करीचं आता म्यानमार कनेक्शन उघड झालंय.याप्रकरणी पोलिसांनी ६ आरोपींना अटक केली असून तस्करीबाबत सखोल तपास केला जातोय. दुर्मिळ खवल्या मांजरांची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणात तस्करी होते. अशीच तस्करी आता जालना जिल्ह्यातही झाली. जालन्यात वन विभागाने मार्च महिन्यात खवल्या मांजराची तस्करी करणाऱ्या ६ जणांना अटक केली होती. या प्रकरणाच्या तपासात खवल्या मांजराची चीन,व्हिएतनाम,थायलंडमध्ये तस्करी होत असल्याची माहिती समोर आलीय.त्यामुळे वन विभाग आता सतर्क झालं असून वेगाने तपास सुरूये.

**खवल्या मांजराचा कशासाठी वापर?**

खवल्या मांजराचा वापर काळ्या जादूसाठी केली जातो. खवल्या मांजरचे मांस हे प्रथिनांनी समृद्ध असल्याचं मानलं जातं. त्यामुळे मांस महाग किमतीत विकले जातं. खवल्या मांजर वाळवी, मुंग्या फस्त करतात, याला नैसर्गिक पेस्ट कंट्रोल म्हंटल जातं. जगातील सर्वात जास्त तस्करी केला जाणार सस्तन प्राणी आहे. जगात खवले मांजराच्या आठ प्रजाती असून त्यातील दोन प्रजाती भारतात आढळतात.

**दलालांना लगाम लावण्याची गरज**

खरंतर वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार खवल्या मांजराची शिकार, विक्री आणि वाहतूक करणं कायद्याने गुन्हा आहे. यात दोषी आढळल्यास ७ वर्षांची शिक्षा होते. मात्र ४० ते ५० हजारांसाठी गावोगावी आता खवल्या मांजराची तस्करी करणाऱ्या दलालांच्या संख्येत वाढ होतेय.त्यामुळे या दलालांना लगाम लावण्याची आता गरज आहे.

**खवल्या मांजराला इतकं महत्व का?**

चिनी आणि व्हिएतनामी औषधांसाठीखवल्यांनामोठीमागणी असते. विदर्भ, मराठवाड्यातील शिकारी ४० हजारांत खवल्या मांजराच्या खवल्यांची विक्री केली जाते. गुजरात, ओडिशा येथील दलालांमार्फत चीन, म्यानमार, व्हिएतनाम इथे खवल्या मांजरांचे अवशेष पाठवले जातात.खवल्या मांजरांच्या अवशेषांची किंमत सुमारे ३० लाखांपर्यंत जाते. गेल्या ४ वर्षात राज्यात १३७ खवल्या मांजरांची तस्करी केली जाते. वन पथकाने संशयित वाशीम जिल्ह्यातील गिरोली येथील अयुब खान मिरादाद खान याच्या घराजवळ पुरलेले मृत खवले मांजर जप्त केलंय. दरम्यान याच्या संपकार्तील एजंटचा वन विभागाकडून शोध घेतला जातोय. खवल्या मांजराला इतकं महत्व का जाणून घेऊयात.

## जप्त केलेला मुद्देमाल २८ वर्षांनंतर परत
## पनवेल शहर पोलीस ठाण्यात काय घडलं



**■पनवेल :** सोन्याला लाखमोलाला भाव मिळाल्यानंतर दादर, मुंबईचे विनोदकुमार जीवलाल शहा यांनी मोठी लॉटरी लागली म्हटल्यास चुकीचे ठरणार नाहीय. त्यांना तब्बल २८ वर्षांपूर्वी जप्त केलेले वडिलोपार्जित सोने परत मिळाले आहे. तेही थोडथोडके नव्हे तर तब्बल १७.५० तोळे सोने. हे सोने धीरज विनोदकुमार शहा आणि विनोदकुमार जीवलाल शहा यांच्या घराच्या झडतीनंतर १९९७ मध्ये जप्त केले होते. त्यावेळी सोन्याचा भाव ४ हजार ७०० रुपये तोळा होता. हे सोने पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या पाठपुराव्यामुळे परत मिळाल्यामुळे शहा यांनी पोलिसांचे आभार मानले आहेत. पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर ५१८/१९९७ भादवि कलम ४२०, ४६७, ४६८, ४७० मधील आरोपी धीरज विनोदकुमार शहा व विनोदकुमार जीवलाल शहा यांच्या घराच्या झडतीत पंचनाम्यामध्ये दागिने जप्त केले होते. हा मुद्देमाल परत मिळण्यासाठी धीरज विनोदकुमार शहा यांनी न्यायालयात अर्ज केला होता. पुढे त्यांचे निधन झाले. त्यानंतर त्याच्या आईने न्यायालयात दागिने परत मिळवेत, यासाठी अर्ज केला होता. परंतु, आईचेही निधन झाल्यानंतर विनोदकुमार जीवलाल शहा यांनी न्यायालायत अर्ज केला होता. मात्र, मुद्देमाल परत मिळण्याबाबत आदेश मिळत नसल्याने हळू-हळू त्यांनी याकडे दुर्लक्ष केले होते. त्यानंतर विनोदकुमार शहा यांच्याकडून कायदेशीर कारवाई पूर्ण करून वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी त्यांचे सोने त्यांच्या ताब्यात दिले. आपले वडिलोपार्जित पिढीजात दागिने पाहून त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. हे दागिने परत मिळवून दिल्याबद्दल त्यांनी वपोनि नितीन ठाकरे आणि पोलीस कर्मचाऱ्यांचे मनापासून आभार मानले. तब्बल 20 वर्षांनी म्हणजेच 2017 मध्ये न्यायालयाने मुद्देमाल परत करण्याचा आदेश दिला होता. मात्र, याची विनोदकुमार शहा यांना काहीच माहिती नव्हती. दरम्यान सह.पोलीस आयुक्त संजय ऐनुपरे, परिमंडळ 2 चे पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी बऱ्याच कालावधीपासून पोलीस ठाण्यात जमा असलेला मुद्देमाल शिल्लक असलेल्या मुद्देलाल परत करण्याची मोहीम सुरू केली. त्यात त्यांना शहा यांचे 17.50 तोळे सोने आढळले. त्यानंतर मुद्देमाल कारकून ज्योती दुधाने आणि सुशीला सवार यांनी प्रचंड मेहनत घेतली. अखेरीस विनोदकुमार जीवलाल शहा यांचा मुंबईतील घराचा शोध घेतला आणि त्यांना जप्त केलेले सोने परत घेऊन जाण्यास सांगितले.

## हुंड्यासाठी दोन विवाहितांचा छळ... सासरच्यांवर गुन्हा दाखल



**■भिवंडी :** माहेरहून हुंडा म्हणून पैसे आणावेत, यासाठी सासरच्यांनी विवाहितांचा छळ केल्याच्या दोन वेगवेगळ्या घटना पोलीस ठाण्यातून समोर आल्या आहेत. यातील पहिल्या घटनेत शांतीनगर पोलीस ठाणे हद्दीतील हसीना बानो अतिक्र रेहमान अन्सारी (२२) हिचा निकाह शांतीनगर परिसरातील पीराणी पाडा मेहबूब नगरमधील अतिकुर रेहमान सुफीयान अहमद अन्सारी याच्यासोबत झाला होता. १८ डिसेंबर २०२३ ते ९ ऑगस्ट २०२४ पर्यंत पतीसह सासरच्या मंडळीने आपसात संगनमताने हसीनाने माहेरहून हुंडा म्हणून ५० हजार रुपये आणावेत यासाठी तिच्याकडे वेळोवेळी तगादा लावून तिचा शारीरिक,मानसिक छळ केला. यासह जेठ उमेदुर रहेमान सुफीयान अहमद अन्सारीने पीडित हसीनाच्या मनास लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य केले. त्यामुळे सासरच्या छळाला कंटाळून अखेर पीडितेने २५ एप्रिल रोजी पती अतिकुर अन्सारी याच्यासह सासरची मंडळी सासरे सुफियान अहमद अन्सारी, जेठ उमेदुर अन्सारी, जेठानी तलत उमेदुर रहेमान अन्सारी, नणंद आफरीन कामरान अन्सारी, जिनत सुफीयान अहमद,नणंदोई कामरान सुफियान अहमद अन्सारी विरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली.

याप्रकरणी पोलिसांनी सर्वांवर गुन्हा दाखल केला आहे. तर दुसऱ्या घटनेत कोनगाव पोलीस ठाणे हद्दीतील जागृती अनिल सोष्टे (२७) यांचे अनिल लहू सोष्टे याच्याशी लग्न झाले असून सासू मीना लहु सोष्टे, दीर सुनील लहु सोष्टे, जाव शबनम उर्फ राणी सुनील सोष्टे, नणंद सुनिता लह सोष्टे व काजल लहू सोष्टे उर्फ काजल नरेश जाधव आदींनी आपसात संगनमताने पीडित जागृतीने वडिलांकडून खोलीच्या कामाकरिता ७ ते ८ लाख रुपये आणावे असा तगादा लावला होता. या कारणासाठी जागृतीचा शारीरिक, मानसिक त्रास देऊन २०२० पर्यंत छळ केला. याप्रकरणी पीडित विवाहिता जागृतीने सासरच्या छळाला कंटाळून २६ एप्रिल रोजी कोनगाव पोलीस ठाण्यात पतीसह सासरच्यांवर तक्रार दाखल केली.

## नाशकात बापानेच पोटच्या पोराचा गळा दाबला
## ९ वर्षीय मुलाचा मृतदेह गोणीत भरून सासूरवाडीत फेकला



**■नाशिक :** नाशिक शहरात बाप मुलाच्या नात्याला काळीमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. नाशिकच्या आम्रपाली परिसरात एका वडिलाने रागाच्या भरात आपल्या ९ वर्षांच्या मुलाची गळा आवळून निर्घृण हत्या केली आहे. एवढंच नाही तर बापाने हत्येनंतर मुलाचा मृतदेह गोणीत टाकून सासूरवाडीला नेत पलंगावर टाकल्याची प्राथमिक माहिती मिळालीय.

**नक्की घडले काय?**

नाशिकमध्ये अतिशय थंड काळजाने बापाने आपल्या नऊ वर्षांच्या मुलाला गळा आवळत संपवल्याचा धक्कादायक प्रकार घडलाय. हत्येनंतर मुलाला गोणीत भरत सासूरवाडीला नेत तिथल्या पलंगावर टाकून दिल्याची संतापजनक घटना घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण नाशिक हादरले आहे. ही घटना उघडकीस येताच परिसरात खळबळ उडाली आणि नागरिकांनी पोलीस नियंत्रण कक्षाला माहिती दिली.उपनगर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून सध्या सखोल तपास सुरू आहे. प्राथमिक तपासात ही हत्या कौटुंबिक वादातून झाल्याचं समोर आलं आहे. सुमित पुजारी (वय ३५) असे आरोपी वडिलाचे नाव असून त्यांनी आपल्या मुलगा गणेश पुजारी याची हत्या केली. कौटुंबिक वादातून झालेल्या वादानंतर रागाच्या भरात सुमित यांनी स्वतःच्या मुलाचा गळा आवळून त्याचा जीव घेतला. प्राथमिक माहितीनुसार, घरात सतत वादाचे वातावरण होते. सुमित पुजारी हे काही दिवसांपासून तणावाखाली असल्याचे समोर आले. कौटुंबिक कलह वाढल्याने पोटच्या पोराचा गळा घोटत त्याला ठार केल्याचं समोर आलं आहे.

नक्की काय वाद झाला? कौटुंबिक वाद किती गंभीर होता? आणि इतक्या टोकाचं पाऊल उचलण्यामागचं नेमकं सत्य काय आहे? हे सर्व तपासानंतरच स्पष्ट होईल. दरम्यान या घटनेच्या तपासासाठी नाशिक गुन्हे शाखेचे एक शोधपथक घटनास्थळी रवाना झालं आहे. नाशिकमधून सलग दुसऱ्या दिवशी ही हत्येची घटना समोर आल्याने संपूर्ण शहरात खळबळ आहे. मुलाच्या मृत्यूने कुटुंबीय सुन्न झाले आहेत. या संतापजनक घटनेमुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. सुमित पुजारी असे मुलाच्या वडिलांचे नाव आहे. या घटनेनंतर नाशिक उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय. अधिक तपासासाठी नाशिक गुन्हे शाखेचे शोध पथक रवाना झाल्याची माहिती आहे. नाशिक शहरात सलग दुसऱ्या दिवशी ही हत्येची घटना समोर आलीय.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com